# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 23/03/2020 (सोमवार)
(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 07 कि.मी अंतरावर मौजा आदासा बसस्टॉप येथे दिनांक 21/03/2020 चे 19.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नागोराव उमराव भोयर, वय 45 वर्षे, रा. आदासा वार्ड. 1, त.कळमेश्वर यांच्या हॉटेलचे लाकडी दाराचा अज्ञात आरोपीने कुलूप तोडुन आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादिचे हॉटेल मधील दुकानात ठेवलेले कोल्डींग बॉटल, स्टेशनरी सामान, बिस्कीट पॅकेट चीप्स पॅकेट पानी बॉटल अंदाजे किंमती 18,000/–रू. व नगदी 1,700/–रू. असा एकुण 19,700 /–रू. ची अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 461, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अनिल तिवारी 9689891486 हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 05 कि.मी. अंतरावर एक्सीस बॅक एटीएम डोणेकर सभागृह जवळ येथे 14/03/2020 चे 10/00 वा. ते 21/03/2020 चे 12.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिपनारायण रामनरेश साही, वय 42 वर्ष, रा. कामठी कॉलरी नं 06, कन्हान हे त्यांचे एसबीआय खात्यातील पैसे काढण्याकरीता एक्सीस बॅक एटीएम येथे गेले होते. दरम्यान पैसे निघाल्यानंतर फिर्यादीच्या पाठीमागे असलेल्या अज्ञात आरोपीने फिर्यादीची दिशाभुल करून आरोपीने फिर्यादीला दुसरे एटीएम कार्ड देवुन, फिर्यादीचे स्वतः ठेवले. यानंतर आरोपीने फिर्यादींच्या खात्यातुन 1,10,000/–रू. काढुन फसवणुक केली. दि. 21/03/2020 चे 12.00 वा. फिर्यादी एटीएम मध्ये पैसे काढण्यास गेले असता त्याची फसवणुक झाल्याचे निदर्शनास आले.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम 420 भादंवी. कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. सुरजुसे 9921434267 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर